क्रमांक : ६५९० /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १४ मार्च, २०२०

**:: कार्यालयीन आदेश ::**

शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी समाप्त होणाऱ्या विधानमंडळाच्या द्वितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन कालावधीत या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाचा विचार करुन, या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२० रोजी सुट्टी देण्यात आली आहे. रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२० या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरु ठेवल्यामुळे सदर दिवसाची बदली रजा मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२० रोजी देण्यात आली आहे. तसेच शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० या शासकीय सुट्टीच्या दिवशी सभागृहाची बैठक आयोजित केली असल्याने त्याची बदली रजा सन २०२० या वर्षामध्ये संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीने उपभोगता येईल.

आदेशानुसार,

( ऋतुराज ज.कुडतरकर )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) निवडसूची.

**प्रतिलिपी :-**

१) उप सचिव (श्रीमती मे.दि.तळेकर) व उप सचिव (श्री.रा.म.तारवी), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सुट्टीच्या दिवशी सदस्यांच्या प्रवास भत्त्याची देयके व रेल्वे कूपन्स देण्याची व्यवस्था करावी.

२) अवर सचिव (श्री.र.ग.जगदाळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) कक्ष अधिकारी, ('ग-१' कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक (अतिरिक्त कार्यभार) ("ग-२' कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) कक्ष अधिकारी, 'ह' कक्ष (विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि रेल्वे कुपन वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती व निवृत्तीवेतन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**टीप :- सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२० व मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२० रोजी कार्यालयीन कामाकरीता कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या 'ग-१' कक्ष, 'ग-२' कक्ष व 'ह' कक्षातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना त्या दिवसाची बदली सुट्टी त्यांच्या विनंतीनुसार देय राहील.**